# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ इ शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

☎ : २५६५६२३४/२५६५७०७६ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web : ropune.org.in


जा.क्र : तंशिविकापु/ससा/सायबरगुन्हेजागरुकता/२०१९/ ५३८७ दिनांक : 21 DEC 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामधील असणाऱ्या
तंत्रशिक्षण संचालनालयाचे अखत्यारीतील संस्था

विषय : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हे जागरुकता अभियान राबविणेबाबत...

संदर्भ : पोलीस उपआयुक्त, अर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर यांचे पत्र क्र.६१४/२०१९ दि.२० डिसेंबर २०१९.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. (प्रत सोबत जोडलेली आहे.)

समाजातील नागरिक, विद्यार्थी यांना ऑनलाईन व्यवहाराबाबत परिपूर्ण ज्ञानाअभावी तसेच इंटरनेट बँकींग, ऑनलाईन ॲप्लीकेशन्स, पेमेंट पोर्टल्स या प्रकारच्या सुविधांविषयी संपूर्ण माहिती नसल्याने सायबर गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. तसेच नोकरी, विवाह, कर्ज, वस्तूंची विक्री असे बहाणे करुन नागरिकांची मोठया प्रमाणात फसवणूक होत आहे. सोशल मिडीयावरुन बदनामी, ब्लॅकमेलींग व तत्सम गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. यासाठी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे.

सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे मार्फत विद्यार्थ्यांना सायबर गुन्हयांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी वर्षभर समुपदेशनाचे कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. एका कार्यक्रमासाठी अंदाजे दीड ते दोन तासांचा वेळ आवश्यक आहे. सदर कार्यक्रमासाठी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे अधिकारी, कर्मचारी आपल्या संस्थेमध्ये येऊन विद्यार्थी, कर्मचारी व शिक्षकांचे समुपदेशन करतील, सदर कार्यक्रम आपल्या संस्थेत आयोजित करण्यासाठी खालील आधिकाऱ्यांशी संस्थेचे प्राचार्य/संचालक यांनी संपर्क साधावा.

| अ.क्र. | नाव व पदनाम | मोबाईल नंबर |
|---|---|---|
| १ | मच्छिंद्र पंडित, पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर | ९५९४९९४२४२ |
| २ | सागर पडवळ, पोलीस उपनिरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर | ९६८९५५२५०१ |

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

| | संभाजी कदम<br>पोलीस उपआयुक्त,<br>आर्थिक व सायबर गुन्हे,<br>पुणे शहर | जा.क्र./पोउआ/आवसा/ ६९४ /२०१९<br>२, साधु वासवानी रोड, पोलीस कमिशनर ऑफ पोलीस ऑफिस, कॅम्प पुणे ४११००१<br>दि. २० / १२ / २०१९ |
|---|---|---|

प्रति,

सहसंचालक
तंत्र-शिक्षण विभागीय कार्यालय,
४१२ ई शिवाजीनगर पुणे.०१६

विषय - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सायबर गुन्हे जागरुकता अभियान राबविणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे येणाऱ्या तक्रारी अर्जाचे प्रमाण पाहता असे लक्षात येते की, नागरिकांमध्ये ऑनलाईन व्यवहाराबाबतचे परिपुर्ण ज्ञान नसल्याने तसेच इंटरनेट बँकींग, ऑनलाईन ॲप्लिकेशन्स, पेमेंट पोर्टल्स या प्रकारच्या सुविधांविषयी इत्यंभूत माहिती नसल्याने सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. नोकरी, विवाह, लोन, वस्तूंची खरेदी विक्री असे अनेक बहाणे करुन नागरिकांची मोठ्या प्रमाणात ऑनलाईन फसवणूक होत आहे. तसेच सोशियल मिडीयावरुन बदनामी, ब्लॅकमेलींग व तत्सम गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. यासाठी नागरीकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयक जागरुकतेची गरज असल्याने सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर यांचेमार्फत विविध स्तरावर नागरीकांसाठी जागरुकता अभियान सुरू करण्यात आलेले आहे. याचाच एक भाग म्हणून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

सर्व शैक्षणीक संस्थांमधील विद्यार्थी हे उज्ज्वल भारताचे भविष्य असल्याने त्यांना सायबर गुन्ह्यांसदर्भात जागरुकता निर्माण करुन दिल्यास ते याबाबत चांगला प्रतिसाद देवून एक जबाबदार नागरिक बनविण्यास सहाय्य करतात. तसेच आपल्या पालकांना व सहकारी मित्रांना सबंधीत माहिती पटवून सांगतात. यासाठी सायबर पोलीस स्टेशन मार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्यवहार, इंटरनेट, सोशल मिडीया, ऑनलाईन बँकींग, पेमेंट पोर्टल्स यांचा वापर करताना घ्यावयाची काळजी यासंदर्भात समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर चे सायबर गुन्ह्यांबाबतचे तांत्रिक व कायद्याचे ज्ञान असलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा कक्ष तयार करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमांतर्गत आपले महाविद्यालयात वैयक्तीक जावून सायबर गुन्हे जागरुकतेबाबत मार्गदर्शन करणे प्रस्तावित आहे. सदरचा कार्यक्रम संपूर्ण वर्षभर सुरु राहणार आहे. सदर कार्यक्रमासंदर्भात पुणे शहर सायबर पोलीस स्टेशन मार्फत मच्छिंद्र पंडित, पोलीस निरीक्षक (मो. नं. ९५९४९९४२४२) व सागर पडवळ, पोलीस उपनिरीक्षक (मो. नं. ९६८९५५२५०१) यांची आयोजन व समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

तरी सदर सायबर गुन्हे जागरुकतेसंदर्भात समुपदेशनाचा लाभ आपले विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या व्यावसाईक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय / अशासकीय ,अनुदानित /विनाअनुदानित पदविका, पदवि व पदव्युत्तर पदवि संस्थांमधील विद्यार्थी / विद्यार्थीनी, स्टाफ व कर्मचारी यांना मिळण्यासाठी नमुद कार्यालयांना आवाहन देवून सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचेशी समन्वय साधून त्यांना सहकार्य करण्यासाठी सुचित करावे अशी विनंती आहे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
20 DEC 2019
आवक क्र. ९२८०९

(संभाजी कदम)
पोलीस उप-आयुक्त
आर्थिक व सायबर गुन्हे,
पुणे शहर.